**MHPA220008752025**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २७/१०/२०२५ |
| नोंदणी तारीख | : | २७/१०/२०२५ |
| निकाल तारीख | : | २८/०७/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०० ०९ ०१ |

---

भाग 'अ'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (I))

## पालम येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

## (पिठासीन अधिकारी मनिषा म. पाटील)

**(जाहीर दिनांक – २८/०७/२०२६)**

---

**नियमित फौजदारी खटला क्र. ११९/२०२५**

(गु.र.क्र. ४०३/२०२५ गंगाखेड पोलीस ठाणे)

**निशाणी क्रमांक – ३७**

**अभियोग पक्ष** — **महाराष्ट्र सरकार तर्फे**
**पोलीस निरीक्षक,**
पोलीस स्टेशन गंगाखेड, ता. गंगाखेड, जि. परभणी.

**प्रतिनिधीत्व** — **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. एन. डावकरे व श्री. पी. एन. सोळंके**

**आरोपी**

१. **एकनाथ हरीभाऊ साबळे,**
वय – ६० वर्षे, व्यवसाय– शेती,

२. **सरस्वती एकनाथ साबळे**
वय – ५५ वर्षे, व्यवसाय– घरकाम,

३. **भिमराव एकनाथ साबळे**
वय – ३१ वर्षे, व्यवसाय– शेती,

४. **पुजा भिमराव साबळे**
वय – २६ वर्षे, व्यवसाय– घरकाम,

आ. क्र. १ ते ४ रा. धनेवाडी,
ता. पालम, जि. परभणी.

**प्रतिनिधीत्व** **आरोपींकरीता वकील श्री. बी. बी. दुधाटे**

**भाग 'ब'**
**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०८/०६/२०२५ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ०८/०६/२०२५ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २७/१०/२०२५ |
| आरोपींविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | ०९/०४/२०२६ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १६/०७/२०२६ |
| निकालाची आरक्षीत तारीख | लागु नाही |
| निकालाची तारीख | २८/०७/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **एकनाथ हरीभाऊ साबळे** | अटक नाही | २३.०३.२०२६ | भा.न्या.सं. कलम २९६, ११८ (१), ११५(२), ३५२, ३५१(३) सह कलम ३ (५) प्रमाणे | निर्दोष मुक्त केले. | -- | निर्दोष मुक्त केल्यामुळे लागू होत नाही. |
| २. | **सरस्वती एकनाथ साबळे** | | | | | | |
| ३. | **भिमराव एकनाथ साबळे** | | | | | | |
| ४. | **पुजा भिमराव साबळे** | | | | | | |

**भाग 'क'**
**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))**

## <u>सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>

## अ. सरकारी

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.१ | सिमा अर्जुन साबळे | फिर्यादी |

## ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## <u>सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी</u>

## अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३२/अ.सा.क्र.१ | फिर्यादवरील अ.सा.क्र. १ यांची सही |
| २. | ३५ | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र (आरोपींनी मान्य केलेला) |

## ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

## क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

## मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | एक घरगुती वापरातील खाली लाकडी पाटा व वरती लोखंडी धारदार पाते असलेली विळी |

# <u>न्यायनिर्णय</u>

## <u>(जाहीर दिनांक- २८/०७/२०२६)</u>

प्रस्तुतचा खटला हा आरोपींचेविरूध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २९६, ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१(३) सह कलम ३ (५)अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

यातील फिर्यादी सिमा ही आरोपी क्र. १ व २ यांची सुन, आरोपी क्र. ३ भिमराव यांची भावजई व आरोपी क्र. ४ पुजा हिची जाऊ आहे. फिर्यादी व आरोपी हे रा. धनेवाडी, ता. पालम, जि. परभणी येथे एकत्रात राहतात. दि. ०८/०६/२०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी ही घरात असताना तिने ठेवलेले पैसे तिला न दिसल्याने तिने त्याबाबत तिची मुलगी साधना हिला विचारले असता आरोपी क्र. १ एकनाथ याने तिला ''तुझ्या मायचा भोक'' अशी अश्लिल भाषेत शिवीगाळ करून ''तु काय आमच्यावर पैशे चोरल्याचा संशय घेत आहे का, आम्ही तुला चोर दिसतो का'' असे म्हणुन लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यामुळे फिर्यादी ओरडु लागली. ती ओरडत असताना आरोपी क्र. २ ही त्याठिकाणी आली व तिने फिर्यादीच्या केसाला धरून तिच्या हातातील विळीचा पाटा तिच्या डोक्यात मारून तिला जखमी केले. आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादीला शिवीगाळ करून ''तु जर पुन्हा आमच्या नादी लागलीस ते तुला खतम करून टाकु'' अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने त्यांच्याविरूध्द गंगाखेड पोलीस स्टेशन गंगाखेड येथे फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीवरुन गंगाखेड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. ४०३/२०२५ ने प्रथम खबरी अहवाल नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार/१२३० शिंदे, पोलीस ठाणे, गंगाखेड यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व तपासाअंती आरोपींचेविरुध्द सबळ पुरावा मिळून आलेने त्यांनी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. दोषारोपपत्राप्रमाणे मी आरोपींचेवर भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २९६, ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (३) सह कलम ३(५) अन्वये दंडनिय अपराध केल्याबाबतचा दोषारोप ठेवला. त्यामधील मजकूर आरोपींना वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपींविरुध्दच्या गुन्ह्याच्या सिध्दतेकरीता अभियोग पक्षातर्फे न्यायनिर्णयाच्या भाग 'क' मधील साक्षीपुराव्याचा आधार घेतला. तद्नंतर अभियोग पक्षाने पुरसीस देवुन त्यांचा पुरावा बंद केला. अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्यावरून आरोपींविरूध्द पुरावा

आला नसल्याने त्यांची निवेदने वगळण्यात आलीत.

**६.** सहाय्यक सरकारी वकील श्री. एस.एन. डावकरे व आरोपी करिता वकिल श्री.बी. बी. दुधाटे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख पहाता, सदर प्रकरणात खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०८/०६/२०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजण्याच्या सुमारास मौजे धनेवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी येथील फिर्यादीच्या घरी आरोपी क्र. १ ने इतर आरोपींच्या सहाय्याने व संगनमताने फिर्यादी यांना ''तुझ्या मायचा भोक'' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | **... नाही** |
| २. | वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपी क्र. २ याने इतर आरोपींच्या सहाय्याने व संगनमताने फिर्यादीस विळीचा लाकडी पाटा फिर्यादीच्या डोक्यात मारून ईच्छापुर्वक दुखापत केली असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | **... नाही** |
| ३. | वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपी क्र. १ ने इतर आरोपींच्या सहाय्याने व संगनमताने फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांना ईच्छापुर्वक दुखापत केली असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | **... नाही** |
| ४. | वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपी क्र. ३ व ४ यांनी इतर आरोपींच्या सहाय्याने व संगनमताने फिर्यादीला शिवीगाळ केली व त्याचा उद्देशपुर्वक अपमान करून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य केलयाचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | **... नाही** |

| | | |
|---|---|---|
| ५. | वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपी क्र. ३ व ४ यांनी इतर आरोपींच्या सहाय्याने व संगनमताने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारी पात्र धाकदपटशा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | **... नाही** |
| ६. | काय आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करणेत येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ ते ५ करीताः–</u>**

**७.** मुद्दा क्र.१ ते ५ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्याचे विवेचन करताना घटनांची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी ते चर्चेकरिता एकत्रात घेण्यात आले आहेत.

८. सदर प्रकरणी अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला तोंडी व लेखी पुरावा तसेच आरोपीविरुध्द नोंद असलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगिक घटक यांचा सारासार विचार करता आरोपींनी फिर्यादीला अश्लिल भाषेत शिवीगाळ करून तिला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली, आरोपी क्र. २ हिने फिर्यादीच्या डोक्यात विळीचा लाकडी पाटा घालुन तिला दुखापत केली तसेच सर्व आरोपींनी तिला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे अभियोग पक्षाने निःसंशयरित्या सिध्द केले आहे काय हे पाहणे अत्यंत जरूरीचे आहे.

९. विवेंचनाला सुरूवात करण्यापुर्वी काही गोष्टींची नोंद घेणे महत्वपुर्ण ठरते यातील आरोपी आणि फिर्यादी यांच्या दरम्यान न्यायालयाबाहेर आपापसात तडजोड झाली असल्याची तडजोड पुरसीस (नि.२८) त्यांनी अभिलेखावर दाखल केली आहे. मात्र भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८ (१), २९६ प्रमाणे शिक्षापात्र असणारे गुन्हे तडजोडीस पात्र नसल्याने सदरचा खटला हा पुढे चालवण्यात आला आहे. या पार्श्वभुमीवर अभिलेखावरील पुराव्याचे साकल्याने अवलोकन केले.

**१०.** याकामी अभियोग पक्षातर्फे तपासलेले सा.क्र.१ फिर्यादी सिमा (नि.३१) हिने तिच्या सरतपासात घटना ही एक वर्षापुर्वी धनेवाडी गावात तिच्या घरी घडली असल्याचे कथन

केले आहे. परंतु, काय घडले होते हे तिला आठवत नसल्याचे तिने कथन केले आहे. फिर्यादीने आरोपींविरूध्द फिर्याद दाखल केली किंवा कसे हेही तिला सांगता आलेले नाही. तिने फक्त फिर्यादीवरील तिची सही (नि.३२) ओळखली व त्यातील मजकुर तिने नाकारला आहे. फिर्यादी अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने त्यांना सुचकप्रश्न विचारले असता त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही कथने केली नाहीत. फिर्यादीने त्यांच्या फिर्यादीमधील अधोरेखांकीत भाग 'अ' प्रमाणे घटना घडली असल्याचे मान्य केलेले नाही याउलट त्यांनी आरोपीने गुन्हा केला असल्याची बाब नाकारली आहे.

**११.** अभिलेखावरील फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादीने आरोपींविरूध्द काहीही कथन केलेले नाही. याउलट त्यांनी अभियोग पक्षातर्फे विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नात त्यांची व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे. फिर्यादी ही महत्वाची साक्षीदार असुन तिनेच अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही व आरोपींची गुन्ह्यातील भुमीका स्पष्ट केलेली नाही. सदर फिर्यादी हिने आरोपींनी तिला अश्लिल भाषेत शिवीगाळ केली, विळीच्या लाकडी पाट्याने तिच्या डोक्यात मारून तिला दुखापत केली व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली तसेच तिला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचेही कथन केलेले नाही. नि. २८ कडील तडजोड पत्राचे अवलोकन करता उभयपक्षकारांमध्ये न्यायालयाच्या बाहेर तडजोड झाली असल्याचे दिसुन येते. अभियोग पक्षाने सा.क्र. १ यांची साक्ष वगळता अन्य कोणत्याही साक्षीदारास याकामी तपासलेले नाही. इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याचे नसल्याबाबत अभियोग पक्षाने याकामी नि. ३३ कडे पुरसीस दाखल केली आहे. आरोपींतर्फे फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.३५) मान्य केले आहे. परंतु, फिर्यादीने आरोपींनी तिला मारहाण केली असल्याचे कथन केलेले नाही त्यामुळे वैद्यकीय प्रमाणपत्रावरील जखमा ह्या फिर्यादीस आरोपींनी मारहाण केल्यामुळे झाल्या असल्याचे सिध्द होत नाही.

**१२.** एकंदरीत अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन प्रस्तुत अश्लिल भाषेत शिवीगाळ करून तिला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली, आरोपी क्र. २ हिने फिर्यादीच्या डोक्यात विळीचा लाकडी पाटा घालुन तिला दुखापत केली तसेच सर्व आरोपींनी तिला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे अभियोग सिध्द करण्यात अभियोग पक्षाला अपयश आल्याचे स्पष्ट दिसून येते.

**१३.** फौजदारी खटल्यांमध्ये आरोपींविरुध्द गुन्हा शाबीतीकरीता अभियोग पक्षाने संशयापलीकडे जाऊन आरोप सिध्द करणे गरजेचे असते. यदाकदाचित अशा प्रक्रियेत संशयाचा एक जरी धागा निर्माण करण्यास आरोपी यशस्वी ठरला असेल तर त्याचा फायदा आरोपीला मिळतो. या खटल्यामध्ये प्रस्तुत आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होण्याइतपत सबळ पुरावा अभियोग पक्षातर्फे पटलावर आणणेत आलेला नाही. प्रस्तुत आरोपींविरुध्द संशयावरुन गुन्हा दाखल केल्याचे दिसून येते. सबब मी मुद्दा क्र. १ ते ५ बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ६ करीताः-</u>**

**१४.** उपरोक्त विवेचनावरून अभियोग पक्षाने आरोपींविरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे शाबीत करण्याइतपत सबळ पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. या कारणास्तव आरोपींची निर्दोष मुक्तता करणे मला उचित वाटते.

**१५.** याकामी दोषारोपपत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे व न्यायनिर्णय भाग 'क' मधील मुद्देमाल रकान्यात नमुद केलेला जप्त मुद्देमाल 'एक घरगुती वापरातील खाली लाकडी पाटा व वरती लोखंडी धारदार पाते असलेली विळी' ही मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नष्ट करणे उचित होईल असे मला वाटते. वर नमुद कारणास्तव मुद्दा क्र. ६ च्या अनुषंगाने, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>:: आदेश ::</u>**

१. **आरोपी क्र. १ एकनाथ हरीभाऊ साबळे, आरोपी क्र. २ सरस्वती एकनाथ साबळे, आरोपी क्र. ३ भिमराव एकनाथ साबळे व आरोपी क्र. ४ पुजा भिमराव साबळे** यांची भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २९६, ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१(३) सह कलम ३ (५) च्या आरोपांतून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तीक जातमुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ (१) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रू.५,०००/- चा वैयक्तीक जातमुचलका द्यावा.

४. प्रस्तुत कामातील जप्त मुद्देमाल 'एक घरगुती वापरातील खाली लाकडी पाटा व वरती लोखंडी धारदार पाते असलेली विळी' हा मुल्यहीन असल्यामुळे तो अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येतो.)**

MANISHA MAHADEO PATIL

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.07.28 18:13:10 +0530

**दिनांक – २८/०७/२०२६** **(मनिषा म. पाटील)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पालम.**